# अतिथीगृह

हे माणूस असणे म्हणजे
आहे एखाद्या अतिथिगृहासमान
रोज सकाळी येतो इथे एक पाहुणा किमान

कधी आनंद, कधी नैराश्य, कधी क्षुद्र विचार
कधी डोळस जाणीव - चमकणारी क्षणात
हे सर्वजण अनाहूत पाहुणे म्हणून येतात

कर स्वागत सर्वांचेच अन उत्तम पाहुणचार
ते व्यथा-वेदनांचे तांडे असले जरी ...
आणि बळजोरीने तुझे घर
विस्कटून लुटून त्यांनी साफ केले तरी ....

आदरपूर्वकच येऊ आणि जाऊ देत त्यांना
या हरेकाच्या अल्प वास्तव्याने कदाचित
एक नवा आनंद निर्माण होईल, काय माहित!

अभद्र विचार, शरम आणि द्वेष यांनाही
नाकारू नकोस, हसतमुखाने भेट दाराशी
आमंत्रित कर, आपुलकीने वाग सर्वांशी

या सर्वांची भेट हे उपकारच आहेत तुझ्यावरचे
कारण यातील प्रत्येकाला तुझा गुरू म्हणून
पाठवले गेले आहे, खूप खूप दूरवरून

“The Guest House” by Jalaluddin Rumi
Translated by Abhay B. Joshi and Milind A. Toro